# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०८/०७/२०२४

# प्रेसनोट

पर्यावरणपुरक उत्सव साजरे करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०५/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सर्व महानगरपालिका हद्दीतील घरगुती गणपती पर्यावरणपुरक असतील याबाबत योग्य ती अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने मा. प्रशासक तथा आयुक्त, अजीज शेख, अति. आयुक्त, जमीर लेंगरेकर तसेच उपायुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहामध्ये दिनांक ८ जुलै, २०२४ रोजी उल्हासनगर शहरातील मुर्ती कारखानदार/मुर्तीकार/मुर्ती विक्रेते यांची बैठक बोलाविण्यात आली होती.

तथापि, केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील मुर्ती विसर्जनाशी संबंधित दिनांक १२ मे, २०२० रोजी सुधारीत मार्गदर्शक तत्व प्रसारीत करण्यात आली असुन त्यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासुन तयार करण्यात येणा-या मुर्त्यांवर बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळे उल्हासनगर शहरातील मुर्ती कारखानदार तसेच विक्रेते यांनी प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) च्या मुर्त्या तयार करू नयेत तसेच त्यांचा साठा, आयात व विक्रीवर बंदी असल्याने प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) च्या मुर्त्याची विक्री होत असल्याची बाब आढळून आल्यास त्यावर नियमानुसार कारवाई होणार असल्याची बाब उपस्थितांच्या निदर्शनास आणुन दिलेली आहे.

प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) च्या मुर्त्या घरगुती उत्सवात मोठया प्रमाणात वापरल्या जातात, त्यामुळे होणारे जलप्रदुषण रोखणेसाठी तसेच जगभरात निसर्गाच्या विविध घटकांमध्ये होणारे प्रदुषण यामुळे होणारी पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी शहरातील मुर्तीकार, कारखानदार, विक्रेते यांनी महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे. त्याकरीता शहरातील मुर्तीकार, कारखानदार, विक्रेते यांनी नागरीकांना शाडू मातीच्या मुर्त्या उपलब्ध करून द्याव्यात व त्याबाबत नागरीकांमध्ये जनजागृतीदेखील करावी.

सदर बैठकीस उल्हासनगर शहरातील मुर्ती कारखानदार, विक्रेते तसेच श्री. गणेश शिंपी, श्री. मनिष हिवरे, श्री. दत्तात्रय जाधव, सर्व सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, श्रीम. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी, श्रीम. विशाखा सावंत, पर्यावरण विभाग प्रमुख तसेच इतर कर्मचारी देखील उपस्थित होते.

(छाया प्रकाश डांगळे)<br>
जनसंपर्क अधिकारी<br>
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.<br>
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका<br>
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका<br>
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.